सं.फौ.प्र.क्र.३०२४९/२०१९
शासन— वि—सुमित
निशाणी क्र०३

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.३,नागपुर.
## (पिठासीन न्यायाधीश व. म. देशमुख)

(फौजदारी प्रक्रिया संहिताचे प्रकरण २१ अन्वये संक्षिप्त खटला)

| | |
|---|---|
| **१. अपराध घडल्याचा दिनांक** | **२९.११.२०१९.** |
| **२. अपराध किंवा फिर्यादीचा दिनांक** | **२९.११.२०१९.** |
| **३. फिर्यादीचे पूर्ण नाव व पत्ता इ.** | सरकार तर्फे<br>पोलीस स्टेशन अधिकारी<br>पोलीस स्टेशन कळमना, नागपूर. |
| **४. आरोपीचे पूर्ण नाव व पत्ता इ.** | सुमित लक्ष्मणराव वाकोडीकर,<br>वय ३० वर्ष, धंदा: मच्छी फ्राई ठेला,<br>रा.कमाल चौक, बाकाभाउ पेठ,गणोबा महाराजची चाल, नागपूर. |

**५. अपराधाचा तपशील**

तुम्ही दिनांक २९.११.२०१९. रोजी वेळ १४.४० वा. दरम्यान, कळमना मार्केट मागील गेटसमोर, नागपुर येथे, सार्वजनिक ठिकाणी आपल्या ताब्यातील सुमित मच्छी फ्राई नावाचा ठेला, उभे करून रहदारीस अडथळा करताना आढळून आलात, त्यायोगे तुम्ही भारतीय दंड संहिता कलम २८३ या अंतर्गत शिक्षेस पात्र असलेला अपराध केला.

आणि या व्दारे मी असा निर्देश देतो की, उक्त आरोपाबाबत तुमची न्याय चौकशी करण्यात यावी.

दि. ०७/१२/२०१९

**(व्ही. एम. देशमुख)**
**न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी,**
**कोर्ट नं ३, नागपुर.**

वरिल अपराधाचा तपशील आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगीतला.

दि. ०७/१२/२०१९

**(व्ही. एम. देशमुख)**
**न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी,**
**कोर्ट नं ३, नागपुर.**

**६. आरोपीचे बयान**

प्र.क्र.१ तुम्हाला प्रकरणांच्या नकला मिळाल्या का ?
उत्तर होय.

प्र.क्र.२तुम्हाला तुमच्यावर लावलेला आरोप आता वाचुन व समजावुन सांगीतला तो समजला का ?
उत्तर होय.

प्र.क्र.३तुम्हाला सरकारतर्फे वकील पाहीजे काय ?
उत्तर नाही.

प्र.क्र.४तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?
उत्तर होय.

वरिल अपराधाचा तपशील आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगीतला, त्याने स्वईच्छीने गुन्हा कबुल केला.

...................................
**आरोपीची सही**
दि. ०७/१२/२०१९.

**(व्ही. एम. देशमुख)**
**न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी,**
**कोर्ट नं ३, नागपुर.**

## न्यायनिर्णय

**१.** सदर आरोपी विरूध्द प्रस्तुत खटला हा भारतीय दंड संहिता कलम २८३ अंतर्गत दाखल करण्यात आला आहे.

**२.** सदर प्रकरणात आरोपी याने त्याच्या अधिवक्ता समक्ष स्व:ईच्छेने गुन्हा कबुल केले आहे. सदर गुन्हयाची कबूली नंतरचे परिणाम या न्यायालयाने त्यास स्वत: समजावून सांगितले, परंतु तो स्वत:हून गुन्हा कबूलीच्या निर्णयास ठाम राहिल्यामुळे त्याची कबूली मान्य करण्यात आली. यावरून मी असे निर्णय करीत आहे की आरोपीने भारतीय दंड संहिता कलम २८३ अंतर्गत गुन्हा केला आहे.

**३.** आरोपीस शिक्षेबद्दल विचारणेत आले. त्याने सदरचा गुन्हा कबूल केला व नियमाप्रमाणे दंड अगर शिक्षा देण्यात यावी अशी विनंती केली. त्याच्या अधिवक्तानी सुध्दा आरोपीचे कथनास दुजोरा दिला. सदर आरोपीचे व त्याच्या अधिवक्ताचे कथन समाधानकारक असल्यामुळे त्याला विहित शिक्षा देण्यात येत आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपीस फौजदारी दंड संहिता कलम २५२ अन्वये कलम २८३ भारतीय दंड संहिता प्रमाणे गुन्हया केल्याने २००/—(अक्षरी दोनशे रूपये मात्र) दंडाची शिक्षा देणेत येत आहे, दंड न भरल्यास त्यास एका दिवसांची साध्या कैदेची शिक्षा देण्यांत येत आहे.

**दि.** ०७/१२/२०१९.

**(व्ही. एम. देशमुख)**
**न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी,कोर्ट नं.३,नागपुर**

## **Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment are same word to word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Argued on | : | 07.12.2019 |
| Dictated on | : | 07.12.2019 |
| Transcribed on | : | 07.12.2019 |
| Checked & signed on | : | 07.12.2019 |

Name of Stenographer :Mrs. Rashmi A. Deshkar (Lr.Gd.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
JUDGMENT
Digitally signed by
Vasim Ahemad A Masjid
Deshmukh
Location: Nagpur
Date: 2019.12.21
13:27:37 +0530